महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २८ /२०२४ दि. ०२/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०३/०३/२०२४ रोजी टिळक रोड, सुतिकागृह, डोंबिवली पूर्व येथे **'कॅन्सर हॉस्पिटल भूमीपूजन'** कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमाकरीता मा. मुख्यमंत्री सो, महाराष्ट्र राज्य तसेच लोक प्रतिनिधी व जनसमुदाय उपस्थित राहणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** टिळक रोड वरील सर्वेश हॉल कडून मदन ठाकरे चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सर्वेश हॉल टिळक रोड व** फडके रोड वरील मदन ठाकरे चौक कडून सर्वेश हॉल टिळक रोड कडे जाणारी सर्व प्रकारच्या वाहनांना **मदन ठाकरे चौक फडके रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** टिळक रोड वरील सर्वेश हॉल कडून मदन ठाकरे चौक कडे जाणारी सर्व प्रकारच्या वाहने सर्वेश हॉल टिळक रोड कडून डावे वळण घेवून पी. पी. चेंबर्स येथून मानपाडा रोड मार्गे व फडके रोड वरील मदन ठाकरे चौक कडून सर्वेश हॉल टिळक रोड कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने फडके रोड वरील अंबिका हॉटेल अथवा आप्पा दातार चौक येथून इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०२/०३/२०२४ रोजी दुपारी १५:०० ते दि. ०३/०३/२०२४ रोजी कार्यक्रम संपेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

**<u>प्रत कार्यवाहीस्तव,</u>**
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**<u>प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,</u>**
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
**<u>प्रत</u>** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.

CamScanner